# Rethinking and Rewriting the History of Freedom Movement in Western Maharashtra

# पश्चिम महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास : पुनर्विचार आणि पुनर्लेखन



# Rethinking and Rewriting the History of Freedom Movement in Western Maharashtra

# पश्चिम महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास : पुनर्विचार आणि पुनर्लेखन


* Editor *

**Dr. D. R. More**

Principal,
Shri Shahaji Chh. Mahavidyalaya,
Kolhapur

* Executive Editor *

**Mr. Suresh Shikhare**

Head, Dept. of History,
Shri Shahaji Chh. Mahavidyalaya,
Kolhapur

* Co-editor *

**Dr. Shivaji Jadhav**

Asst. Professor, Dept. of History,
Shri Shahaji Chh. Mahavidyalaya,
Kolhapur



ISBN - 978-81-927211-0-5

* Publisher *
Dr. D. R. More
Principal, Shri Shahaji Chh. Mahavidyalaya, Kolhapur

* First Edition 2015.

* Financial Support
- Indian Council of Historical Research, (ICHR) New Delhi

© Principal, Shri Shahaji Chh. Mahavidyalaya, Kolhapur
*All rights reserved.*
*This book or any part thereof may not be*
*Reproduct in any form without the written*
*Permission of the Publisher.*

*Prarup Publication, Kolhapur*
**ISBN :** 978-81-927211-0-5

* **Type Setter :** Shravan Typing Center,
Ganesh Patil, SIBER Chowk,
Kolhapur.

* **Printed at :** Yash Printers,
Panjarpol Industrial Estate,
Kolhapur.

* **Price :** Rs. 350/-

* **Disclaimer :**

*The views expressed by the authors in their articles, reviews etc. intghis issue are their own. The editor and publisher are not responsible for them. All disputes concerning the proceeding/book shall in the court at Kolhapur, Maharashtra.*

**ISBN - 978-81-927211-0-5**

५९) प्रतिसरकारचे निर्माते क्रांतिसिंह नाना पाटील : एक ऐतिहासिक अभ्यास ..... २४३
– डॉ. युवराज दीक्षित
६०) सातारच्या प्रतिसरकारमधील राजमती पाटील यांचे कार्य .................. २४८
– रोहिणी रामचंद्र हाके
६१) १९४२ चा स्वातंत्र्यलढा आणि क्रांतिअग्रणी जी. डी. लाड .................. २५२
– प्रा. विकास येलमार
६२) प्रतिसरकारमधील क्रांतिकारकांची रेल्वे पगार गाडी लुटीची कामगिरी........ २५५
– प्रा. नवनाथ ज्ञानदेव इंदलकर
६३) प्रतिसरकारमधील तुफान सेना स्थापना व कार्यपद्धती ........................ २५७
– सौ. सीमा इंदलकर, प्रा. डॉ. विलास निंबाळकर
६४) नाना पाटील यांचा चळवळीतील सहभाग व इतरांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन ............................................ २६०
– कु. शुभांगी भैरवनाथ भोसले
६५) पश्चिम महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतीवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे योगदान.............................................. २६४
– प्रा. कुंभार रामचंद्र वसंत
६६) सातारा प्रतिसरकारचे अर्थकारण : एक अभ्यास .......................... २६८
– प्रा. डॉ. सुमित संभाजी यादव
६७) सन १९४२ च्या चळवळीतील किसन वीर यांचे योगदान ................... २७४
– प्रा. डॉ. कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव
६८) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिसिंह नाना पाटील यांचे योगदान ....... २७९
– प्रा. डॉ. ए. एस. टिके
६९) क्रांतीवीर किसन वीर यांचे १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान.......... २८४
– प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम
७०) लक्ष्मीबाई नाईकवडी यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य .................... २८९
– श्री. मारूती नागोजी पाटील
७१) क्रांतीसिंह नाना पाटील यांचे सातारच्या स्वातंत्र्य चळवळीतील अलौकिक योगदान ............................................ २९२
– प्रा. डॉ. शिवाजीराव चव्हाण
७२) क्रांतीसिंह नाना पाटील आणि प्रतिसरकार ................................ २९६
– सौ. पुष्पांजली चंद्रशेखर कोळेकर

ISBN - 978-81-927211-0-5

# सातारा प्रतिसरकारचे अर्थकारण : एक अभ्यास

प्रा. डॉ. सुमित संभाजी यादव
वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराड

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अखेरचा टप्पा म्हणून १९४२ च्या चळवळीकडे पाहिले जाते. या आंदोलनात सामान्य जनतेने असामान्य शौर्य दाखविले. १९४२ पूर्वी भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या कोणत्याही टप्प्यात स्वातंत्र्योत्सुक जनतेला मोकळे रान दिले गेले नव्हते. महात्मा गांधीजींनी काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारल्यापासून जवळजवळ २२ वर्षे कार्यकर्त्यांना संयम राखावा लागला होता. इंग्रजांच्या विरोधात जहाल भूमिका घ्यायची इच्छा असूनही कार्यकर्त्यांना तसे वागता आले नव्हते. परंतू इंग्रजांनी चालते व्हावे असे म्हणत 'चले जाव'चा ठराव महात्मा गांधीजींच्या उपस्थितीत संमत झाल्यामुळे जनतेत उत्साह संचारला होता. या आंदोलनाचा कळस म्हणजे सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली झालेली 'सातारा प्रतिसरकारची' स्थापना होय. या चळवळीचे नेतृत्त्व हे प्रामुख्याने जिल्ह्यातील लोकांनीच केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात सातारा प्रतिसरकारच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**१९४२ मधील साताऱ्यातील भूमिगत लढा :**

८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसच्या मुंबई येथील अधिवेशनात महात्मा गांधीजींनी जनतेला 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र देवून, सर्वांनी या क्षणापासून स्वत:ला स्वतंत्र समजून कृती करावी असा संदेश दिला. ९ ऑगस्टच्या पहाटेपूर्वीच ब्रिटिश सरकारने महात्मा गांधीजीसहीत सर्व प्रमुख काँग्रेस नेत्यांना अटक करून देशात अटकसत्र सुरू केले.[1] तेव्हा अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यांनी भूमिगत राहून ही चळवळ जोमाने सुरू ठेवली. सातारा जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते मुंबईला अधिवेशनासाठी गेलेले होते. अटकसत्रातून वाचून मिळेल त्या वाहनाने ही मंडळी साताऱ्यात परतली. आपापल्या भागात येताच त्यांनी प्रभातफेऱ्या, हरताळ सभा घेवून इंग्रजांविरोधी लढ्याचे रणशिंग फुंकले. सरकारच्या दहशतीचा निषेध करण्यासाठी २४ ऑगस्ट १९४२ ला कराड कचेरीवरील काढलेला अहिंसात्मक मोर्चा यशस्वी झाला. पाठोपाठ पाटण व तासगांवाचाही मोर्चा यशस्वी झाला. परंतू त्यानंतरील वडूज व इस्लामपूर येथील शांततापूर्ण मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये ११ आंदोलक हुतात्मे झाले.[2] सरकार आपली अहिंसात्मक आंदोलने बळाने दडपणार हे दिसताच जिल्ह्यातील लोकांनी नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली भूमिगत लढा सुरू केला.

सातारा जिल्ह्यातील भूमिगतांनी सरकारच्या प्रतिकांवर व सामर्थ्यस्थळांवर हल्ले चढवले. टेलिफोन, टेलिग्राफच्या तारा व खांब पाडून सरकारची संदेशवहन यंत्रणा कोलमडून टाकली होती. रेल्वे स्टेशने जाळली होती. तसेच दळणवळणाला अडथळा करण्याचा घातपाती कार्यक्रम पहिल्यांदाच यशस्वीपणे अंमलात आणला. १९४२ मध्ये एकूण ४६ वेळा जिल्ह्यात विविध ठिकाणी रेल्वेचे रूळ उघडून टाकून घातपात करण्यात आला.[3] परंतु या प्रत्येक



ISBN - 978-81-927211-0-5

घातपाती कार्यक्रमात अगदी नियोजनपूर्वक फक्त सरकारी गाड्यांच [illegible] यात एकाही व्यक्तीचा मृत्यु झाला नाही किंवा कोणताही भूमिगत पकडला [illegible]कार अगदी हतबल झाले होते. यावरून साताऱ्याच्या भूमिगतांनी नियोजनपूर्वक [illegible]ती कृत्यांचे महत्त्व लक्षात येते. पुढील काळात देशातील भूमिगत चळवळी [illegible]त असताना साताऱ्यातील भूमिगतांनी १ जून, १९४३ रोजी कामेरी, ता. वाळवा येथे सातारा प्रतिसरकारची स्थापना केली.[4]

साताऱ्यात स्थापन झालेले हे देशी सरकार इंग्रज शासनाला समांतर असे कार्य करण्यासाठी चालू झालेले होते. निव्वळ घातपाती कार्यक्रम न राबविता जनताभिमुख कार्य करून जनतेला हे प्रतिसरकार आपले वाटले पाहिजे याची खबरदारी भूमिगतांनी प्रथमपासूनच घेतली होती. तसेच जुलमी ब्रिटिश राजवटीला डावलून कार्य करताना पकडले जाणेची शक्यता असूनही हे प्रतिसरकार चालविण्यासाठी नाना पाटलांनी वेगवेगळ्या मार्गाने आर्थिक नियोजन केले.

**शेणोली पे–ट्रेन लूट :**

(B) जिल्ह्यातील भूमिगतांकडे सातारा प्रतिसरकारच्या लढ्यासाठी लागणारी हत्यारे होती. पण दारूगोळा नव्हता. कोणत्याही लढ्याच्या यशस्वीतेसाठी भक्कम आर्थिक पाठबळाची गरज असते याची कल्पना नाना पाटलांना होती. परंतू युद्धसदृश्य परिस्थितीत प्रतिसरकारचे आर्थिक नियोजन शिस्तबद्ध व कायदेबद्ध करणे शक्यच नव्हते. म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेकडून कररूपाने वसूल केलेला पैसाच लुटून आपल्या प्रतिसरकारसाठी वापरण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी सातारा जिल्ह्यातून रेल्वे कामगारांचा पगार घेवून जाणारी पे–स्पेशन ट्रेन लुटण्याचे ठरविले व याची जबाबदारी नाथाजी लाड, नागनाथ नाईकवडी व जी. डी. लाड यांचेवर सोपविली.

नाना पाटलांच्या आदेशानुसार भूमिगतांनी पे–स्पेशल ट्रेनच्या मिरजेकडून पुण्याकडे जाणाऱ्या मार्गाचे निरीक्षण करून गाडी लुटण्याची जागा निश्चित केली. नियोजनाप्रमाणे ७ जून, १९४३ रोजी नागनाथ नाईकवडी, जी. डी. लाड आदी २५ ते ३० भूमिगत हत्यारांसह शेणोलीच्या खिंडीतील बोगद्याच्या माथ्यावर दबा धरून बसले होते. त्यांनी रेल्वे रूळावर दगड रचून रेल्वेला अडथळा निर्माण करून ती थांबविली. जी. डी. लाड यांनी चटकन इंजिनवर चढून ड्रायव्हरला बंदुकीचा धाक दाखवून ताब्यात घेतले. तर नाथाजी लाड व नागनाथ अण्णांनी डब्यातून पैशांच्या पेट्या बाहेर काढून फोडल्या. त्यामध्ये दहा रूपयांच्या आतील नोटा व नाणी होती. ती लगोलग पोत्यात भरून २० मिनिटात भूमिगत पसार झाले. या लुटीत १९,७१६/– रूपये मिळाले.[5] अशा प्रकारे नाना पाटलांनी प्रतिसरकारची प्रारंभीची पैशाची ददात मिटवली. तसेच यामुळे भूमिगत आंदोलनाला आलेली मरगळ दूर झाली. आपले सरकार जोमाने कार्यरत झाल्याची ग्वाही जनतेला मिळाली.

**न्यायव्यवस्थेतून मिळणारा पैसा / अंतर्गत कारभारातून मिळणारा पैसा:**

३ ऑगस्ट, १९४३ रोजी पणुंब्रे येथे सातारा प्रतिसरकारची दुसरी बैठक झाली. या बैठकीत कार्यकर्त्यांच्या सर्व शंकांचे समाधान केले गेले. लढा निर्धाराने दीर्घकाळ सुरू



ISBN - 978-81-927211-0-5

ठेवण्याचे ठरविले गेले. तसेच औंध संस्थानच्या घटनेच्या धर्तीवर प्रतिसरकारची घटना तयार केली गेली. प्रतिसरकारची कार्यकारणी जाहीर केली गेली. सातारा जिल्ह्याचे अठरा विभाग करून त्याचे विभागनायक व उपनायकही जाहीर केले गेले. भूमिगतांच्या सर्वसाधारण बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे हे कार्यकारणीचे प्रमुख काम होते.[९]

प्रतिसरकार हे एक युद्ध काळातील सरकार असल्यामुळे त्याचा कार्यालयीन व्याप कमी होता. त्यामुळे नियमित कार्यालयीन सेवक नेमण्याची गरज भासली नाही. परंतू काही भूमिगतांनी स्वेच्छेने कार्यालयीन कामकाज पाहिले. प्रतिसरकारची रचना ही साधी व सुटसुटीत अशी होती. नाना पाटलांनी प्रतिसरकारच्या माध्यमातून साताऱ्यात ग्रामराज्याची स्थापना केली होती. स्त्रियांसंदर्भात अन्याय केल्यास गुन्हेगारांना कडक शिक्षा देवून त्यांच्यावर जरब बसविली. शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या सावकारांवर दंड बसवून पैसे जमा केले. प्रतिसरकारच्या लढ्याला जनतेचा पाठींबा होता ते स्वयंस्फूर्तीने ब्रिटिश अधिकाऱ्यांएवेजी प्रतिसरकारच्या नेत्यांकडे सारा जमा करीत होते. तसेच जनतेतून उत्स्फूर्तपणे भूमिगतांच्या राहण्या—जेवण्याची सोय केली जात होती. तसेच ब्रिटिश यंत्रणा मोडून काढल्यानंतर जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी साताऱ्यात स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था निर्माण केली होती. तेथे न्यायदनाचे काम निःपक्षपातीपणे आणि सुरळीतपणे चालत होते. त्यामुळे ही न्यायालये जनतेत प्रिय होती. या न्यायालयात अर्ज करण्यासाठी प्रत्येकी आठ आणे म्हणजेच पन्नास पैसे एवढी फी होती. अपील करण्यास वेगळी फी तसेच वाद असल्यास जास्त फी घेतली जाई. प्रतिसरकारच्या न्यायालयात एकूण १८५० अर्ज आले होते त्यापैकी ११६० खटले निकाली काढले गेले होते[७] अशा प्रकारे प्रतिसरकारच्या अंतर्गत कारभारातूनही प्रतिसरकारसाठी पैशाची निर्मिती होत होती.

प्रतिसरकार स्थिरावल्यानंतर जनतेला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढून स्वतंत्र देशाचा कार्यभार सांभाळण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. तसेच राष्ट्रसेवा दलाची स्थापना करून गावोगाव ग्रामस्वच्छता अभियान, प्रौढ साक्षरतेचे वर्ग, वाचनालये सुरू केली गेली. आपली सुरक्षा सांभाळत युद्धसदृश्य स्थितीतही जनकल्याणासाठी धडपडणाऱ्या या लोकाभिमुख प्रतिसरकारचा सामाजिक आशय दिसतो. तर सरकारकडे उपलब्ध असलेल्या पैशाचा वापर हा प्रामुख्याने जनतेच्याच कल्याणासाठी वापरण्याचे काळातील आदर्श सरकारसारखे धोरण प्रतिसरकारने वापरल्याचे दिसून येतो.

### ❖ धुळे खजिना लूट :

सातारा प्रतिसरकारची आर्थिक गरज ही शेणोली पे—ट्रेन लूट, न्यायदान प्रक्रियेतून होणारी अर्थप्राप्ती तसेच सारा प्राप्तीतून भागविली जात होती. परंतू प्रतिसरकारच्या नवीन योजना राबविण्यासाठी जास्तीच्या पैशाची आवश्यकता होती. या गरजेतून नाना पाटलांच्या मार्गदर्शनाने जी. डी. लाड, नागनाथ नाईकवडी, धोंडीराम माळी, निवृत्ती कळके इत्यादींनी एक धाडसी बेत आखला. तो म्हणजे धुळे खजिन्याची लूट होय. याकामी खानदेशातील डॉ. उत्तमराव पाटील या धाडसी भूमिगतांची त्यांना मोलाची मदत झाली.

भूमिगतांनी नियोजनपूर्वक चिमठाण्याजवळील डोंगरात खजिना लुटण्याचा बेत पक्का केला होता. यासाठी चार—चार जणांचे दोन गट पाडले गेले. पहिल्या गटात जी. डी. लाड, नागनाथ नाईकवडी, किसन मास्तर व शंकर माळी हे होते. तर दुसऱ्या गटात डॉ.



उत्तमराव पाटील, धोंडीराम माळी, निवृत्ती कळके व अप्पा पाटील हे होते. ठरल्याप्रमाणे पहिल्या गटातील जी. डी. लाड नाईकवडी [illegible] सुरू केली. येणाजाणारी वाहने त्यांचे भांडण पाहून थांबत व भांडण मिटवून पुढे जात. गाडी पुढे गेली की भूमिगतांचे भांडण पुन्हा सुरू होई. तर दुसऱ्या गटातील डॉ. उत्तमराव पाटील व सहकाऱ्यांनी शिताफीने खजिन्याच्या बसमध्ये प्रवेश मिळवला होता. या बसमध्ये खजिन्याची राखण करण्यासाठी दोन पोलिस होते खजिन्याची बस नियोजित जागेजवळ येताच गाडीतील अप्पा पाटील यांनी ओकण्याचे निमित्त करून खिडकीतून डोके बाहेर काढले आणि खुणेचा रुमाल फडकवून बसमधील सहकाऱ्यांनाही सावध राहण्याची खूण केली. चढावर [illegible] चालू असल्याने बसचा वेग कमी होवू लागला तेव्हा धोंडीराम माळी यांनी रिव्हॉल्व्हरने हवेत दोन गोळ्या झाडून ड्रायव्हरला बस थांबविण्यास सांगितले. पण ड्रायव्हरने त्यांचे न ऐकता गाडीचा वेग वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नाईलाजाने धोंडीराम माळी यांनी ड्रायव्हरवर गोळी झाडली. त्याचवेळी रस्त्यावरून नागनाथ अण्णा जलदीने बसमध्ये आले व त्यांनीही ड्रायव्हरवर एक गोळी झाडली. जखमी ड्रायव्हरचा गाडीवरील ताबा सुटून बस गिअरमध्ये बंद पडली. इकडे बसमधील पोलिसांनी काही करण्यापूर्वीच धोंडीराम माळी यांनी हेड कॉन्स्टेबलला गोळी घालून सर्व प्रवाशांना खाली उतरण्यास सांगितले. तीन भूमिगतांनी या प्रवाशांना एका बाजूला उभे केले. तर उरलेल्या पाच जणांनी बसमधील खजिन्याच्या पेट्यांची कुलपे तोडून त्यातील नोटा आपली धोतरे फेडून त्यात बांधून घेतल्या व एक हजार रूपयांची नाणी तेथील लोकांना घेवून जाण्यासाठी ठेवली. ह्या घटना केवळ २० मिनिटातच घडल्या. भूमिगतांनी तेथून निघताना बसचे टायर गोळ्या मारून फोडले व महात्मा गांधीजी की जय, भारत माता की जय, नाना पाटील की जय अशा घोषणा देवून तेथून पलायन केले. ही घटना सकाळी १० ते १० च्या दरम्यान घडली.[९]

लुटीची बातमी समजताच धुळ्याहून पोलिस पार्टी तेथे हजर झाली. त्यांनी भूमिगतांचा पाठलाग सुरू केला. सायंकाळी सहाच्या सुमारास भूमिगतांची व पोलिसांची गाठ रूडण्याच्या जंगलात पडली. पोलिसांनी गोळीबारास सुरूवात करताच भूमिगतांकडूनही प्रत्युत्तरासाठी गोळीबारास सुरूवात झाली. या गोळीबारात जी. डी. लाडांच्या पायाच्या पोटरीत गोळी लागली. तर नागनाथ अण्णांच्या खांद्याला गोळी चाटून गेली. तरीही भूमिगतांनी निकराने प्रतिकार केला. शेवटी अंधार पडल्यामुळे पोलिसांनी माघार घेतली.[१०] नंतर भूमिगतांनी या रूडण्याच्या जंगलात आपले दोन गट पाडले. पहिल्या गटात शंकर माळी हे तिथले माहितगार, जखमी नागनाथ नाईकवडी, निवृत्ती कळके, आप्पा पाटील व लुटीचा अर्धा भाग. तर दुसऱ्या गटात डॉ. उत्तमराव पाटील हे माहितगार, जखमी जी. डी. लाड, किसन मास्तर, धोंडीराम माळी व लुटीचा अर्धा भाग. असे विभाजन करून वेगवेगळ्या मार्गाने १६ एप्रिलपर्यंत बोरकुंडला पोहोचण्याचे ठरले. जर नियोजनाप्रमाणे एक गट आला नाही तरीही ठरलेल्या वेळी दुसऱ्या गटाने साताऱ्याकडे पलायन करण्याचेही ठरले. दोन्ही गट अतिशय शिताफीने बोरकुंडला ठरलेल्या ठिकाणी १६ एप्रिलला पोहोचले. एकमेकांचे क्षेमकुशल झाल्यानंतर लगेचच ते डॉ. उत्तमराव पाटलांच्या सासरी म्हणजेच साकोरा येथे आले. तेथे पैशाची मोजदाद केली. कारण काही पैसे या जीवघेण्या धावपळीत गहाळ झाले होते. तरीही सर्व रक्कम मिळून ४ लाख, ३१

हजार एवढी भरली. या रकमेपैकी एक लाख रूपये खानदेशसाठी डॉ. उत्तमराव पाटलांकडे दिले गेले. एक लाख मध्यवर्ती संघटनेसाठी अच्युतरावांकडे पाठविले व उरलेली रक्कम घेवून सर्वजण सातार्‍यात परतले.[११]

अशा प्रकारे कोणाही भूमिगतास अटक न होता सर्वजण प्रचंड खजिन्यासह सातार्‍यात सुखरूप परतले. सरकारची नाचक्की झाली. धुळ्याच्या या खजिन्याचा वापर करून नाना पाटलांनी साताराच्या प्रतिसरकारची मजबूत अशी चौकट उभारून ग्रामराज्य बळकट केले. धुळ्याच्या खजिन्याची लूट हे सातारा प्रतिसरकारच्या कारकिर्दीतील रोमहर्षक अशी घटना आहे.

धुळ्यातून मिळविलेल्या पैशाच्या जोरावर प्रतिसरकारची अर्थव्यवस्था भक्कम झाली होती. याच्या जोरावर या सरकारची प्रगतीपूर्वक वाटचाल सुरू राहिली. या अर्थप्राप्तीतील ७० हजार रूपये देवून नाना पाटलांनी प्रतिसरकारचे बाह्य संरक्षण करण्यासाठी मिलिटरी संघटना उभारण्यासाठी नागनाथ नायकवडींना दिले. नागनाथांनी गोव्याहून शस्त्रास्त्रे व दारूगोळा जमा केला. तसेच आझाद हिंद सेनेतील मनसा सिंग व नानक सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली मिलिटरी संघटनेचे काम सुरू केले. २५ फेब्रुवारी, १९४६ मध्ये या संघटनेची ब्रिटिश पोलिसांशी चकमक झाली. यात किसन अहिर व नानक सिंग मारले गेले.[१२] यानंतर नाना पाटलांनी नागनाथ नायकवडींना या मिलिटरी संघटनेची छावणी तात्पुरती बंद करण्यास सांगितले. लष्करी संघटना उभी करण्याचा हा प्रयोग अत्यंत क्रांतिकारक असा होता. अशा प्रकारच्या संघटनेची स्थापना करण्याचा प्रयोग हा सातारा प्रतिसरकारचा भक्कम अर्थनीतिचेच द्योतक होते.

बदलत्या राजकीय परिस्थितीत भारताला स्वातंत्र्य मिळण्याचे नक्की झाल्यावर प्रतिसरकार विसर्जित केले गेले. तेव्हाही यातील बरीच रक्कम शिल्लक होती. नंतर या रकमेचे काय करायचे हा प्रश्न नाना पाटील व भूमिगतांना पडला होता. तेव्हा हा जनतेचा पैसा आहे आणि तो प्रतिसरकारच्या समाप्तीनंतर वापरण्याचा अधिकार आपल्याला नाही. तो भारत सरकारला आहे. या भावनेतून नाना पाटलांनी ही रक्कम त्याच्या संपूर्ण हिशोबाच्या कागदपत्रांसह दिल्लीला जावून सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे जमा केली.[१३] भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात चळवळीच्या यशस्वीतेसाठी निर्माण केलेल्या पैशाचा संपूर्ण हिशोब देणारे सातारा प्रतिसरकार हे एकमात्र उदाहरण असावे. संपूर्ण आंदोलनात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी निर्माण केलेल्या आदर्शाच्या परंपरेला साजेसे असे हे कृत्य होते.

**समारोप**

जगातील प्रत्येक लढ्याच्या यशस्वीतेच्या पाठीमागे आर्थिक पाठबळाची भूमिका फार महत्त्वाची असते. १९४२ च्या लढ्यात सातार्‍यातील भूमिगत आंदोलनाचे रूपांतर पुढे प्रतिसरकारच्या संघटित लढ्यात झाले. सातारा प्रतिसरकार हे केवळ घातपाती कार्यक्रम राबवून ब्रिटिशांना घालवून देण्यासाठी स्थापन झालेले नव्हते. तर त्यास दूरगामी टिकाणारा सामाजिक आशयही होता. भूमिगत सरकार चालविताना कार्यकर्त्यांचे राहणे, प्रवास, वेषांतरावरील खर्च, हत्यारे व दारूगोळा जमा करणे, समाजउपयोगी कामे करणे आदीसाठी पैशांची फार मोठ्या प्रमाणावर गरज होती. प्रतिसरकारसाठी पैसा उभारताना तो स्वतःच्या भागातील जनतेला कमीत कमी तोशिष देवून शत्रूकडून मिळविण्याची छत्रपती शिवाजी महाराजांची रणनिती सातारा प्रतिसरकारच्या क्रांतिसिंह नाना पाटील यांनी शेणोली पे-ट्रेन लूट व धुळे खजिन्याच्या लुटीतून

ISBN - 978-81-927211-0-5


पूर्णपणे अंमलात आणल्याने दिसून येते. प्रतिसरकारच्या समाप्तीनंतर त्यांच्याजवळील शिल्लक रक्कम केंद्रिय सरकारकडे सुपूर्त केल्यामुळे त्यांच्या पारदर्शी कारभाराची प्रचिती दिसून येते. परंतू या सरकारची अर्थनीति ही आधुनिक काळातील इतर सरकारप्रमाणे पूर्णपणे आदर्श होता असे म्हणता येणार नाही. कारण या युद्धकालीन सरकारचा कायदा लष्करी होता याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे. तरीही या सरकारने आपल्या मर्यादा ओळखून केलेल्या कार्यामुळे १९४२ च्या लढ्यात देशाची मान वाढली होती. यामागे या प्रतिसरकारला असणारा जनतेचा पाठींबा व भक्कम अर्थनीति यांचा मोलाचा वाटा आहे.

**संदर्भ**


(१) मुलाखत : नाईकवडी नागनाथ, दि. १८/११/२०१०.
(२) पाटील विलास, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंतवडि, तृतीय आवृत्ती, ऑक्टोबर, १९९२, पृष्ठ – ९८.
(३) मुंबई पुराभिलेखागार विभाग, महाराष्ट्र राज्य, होम डिपार्टमेंट (स्पे.) फाईल नं. १११०(१२५)A(५), १९४२–४३, पृष्ठ–१९.
(४) साप्ताहिक नवयुग, सातारा प्रतिसरकार विशेषांक, दि. १२ मे, १९४६, पृष्ठ–१७.
(५) पाटील उत्तमराव व लाड अप्पासाहेब, क्रांतिवीर दे. भ. नाना पाटील, उषा प्रकाशन, औंध, फेब्रुवारी, १९४७, पृष्ठ–११०, १११.
(६) गुरव बाबुराव, उजळती प्रकाशरेषा भारतीय स्वातंत्र्य चळवळ – विविध प्रवाह, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंतवडिये, प्रथमावृत्ती, ३ ऑगस्ट १९९९, पृष्ठ–१४०, १४१.
(७) पाटील उत्तमराव व लाड अप्पासाहेब, उपरोक्त पृष्ठ–१२४, १२५.
(८) पाटील उत्तमराव, क्रांतिपर्व, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, मे, १९८७, पृष्ठ – १३२, १३३.
(९) मुलाखत : लाड जी. डी., दि. २३/१०/२०१० व मुलाखत : नाईकवडी नागनाथ, दि. १८/११/२०१०.
(१०) मुंबई पुराभिलेखागार विभाग, उपरोक्त, फाईल नं. १११०(४१)३(५) १९४४, पृष्ठ – १३.
(११) पाटील उत्तमराव व लाड अप्पासाहेब, उपरोक्त, पृष्ठ – १३०.
(१२) धर्माधिकारी भालचंद्र विष्णुपंत, क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी, क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी गौरव समिती, वाळवा प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १३ जुलै, २००७, पृष्ठ – २० ते २४.
(१३) मुलाखत : लाड जी. डी., दि. २३/१०/२०१०


ISBN - 978-81-927211-0-5